दिग्दर्शक प्रयत्न करताना बघितल्यावर लक्षात आले, की हा महोत्सव दिग्दर्शक मंडळी चालवत आहेत. त्यावेळी येथील सगळ्या मंडळींशी संवाद साधता आला.

फरक सांगताना गोवारीकर म्हणाले, की मोठे महोत्सव अनेक वर्षांपासून सुरू आहेत, ते प्रस्थापित झाले आहेत. पण, त्यात फरक आहे. येथे मला स्थानिक

शिक्षणाचे साधन आहे. चित्रपट, चित्रपटामागची कार्यपद्धती, चित्रपट कसा बघावा हे शिक्षण या गुणवंतांना मार्गदर्शक ठरणार आहे.

भोसले, सानिका काळे व कारचालक हे चौघे गंभीर जखमी झाले, तर सहा महिन्यांचे बाळ जखमी झाले आहे.

# उमरग्याच्या दोन कन्यांचा राज्यपालांकडून सन्मान



**पुणे** : वाढत्या सायबर गुन्हेगारीबद्दल समाजामध्ये व्यापक जनजागृती करणाऱ्या प्रा. ज्योतीमा शाळकर व प्रतीक्षा पांगे या दोघींचा राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**उमरगा, ता. १४ (बातमीदार) :** लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयात (स्वायत्त) कार्यरत असलेल्या उमरग्यातील एक प्राध्यापिका व विद्यार्थिनीचा राज्यापाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

आजकालच्या वाढत्या सायबर गुन्हेगारीबद्दल समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय, (स्वायत्त) आणि क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम लातूर जिल्ह्यासह धाराशिव, सोलापूर, परभणी या जिल्ह्यांमधील शाळा, महाविद्यालयांत व समाजातील अनेक घटकांतील लोकांसाठी राबविण्यात आला. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातीलबी.सी.एस. व बी.एस्सी. सी.एस. च्या एकूण ४० विद्यार्थ्यांनी सायबर योद्धा वप्रा. ज्योती वैजिनाथ माशाळकर यांनी समन्वयक म्हणून काम केले. या उपक्रमांतर्गत एकूण १९० शाळा व महाविद्यालये, विविध शासकीय कार्यालये, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा न्यायालये, बँका, साखर कारखाने आदी ठिकाणी सत्तर हजारांपेक्षा जास्त लोकांना वेगवेगळ्या सायबर फ्रॉड्स कसे घडतात व त्यापासून सावधगिरी कशी बाळगायची, याबद्दल माहिती दिली. या उत्कृष्ट कार्यासाठी महाविद्यालयाला क्विक हिल फाउंडेशनचास्मार्ट सायबर क्लब रनर अप- १ वतसेच बी.एस्सी.च्या तृतीय वर्षातील प्रतीक्षा पांगे हिलाबेस्ट सेक्रेटरी रनर अप-१ हापुरस्कार महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुण्यातील शनिवार वाडा येथे रविवारी (ता. १२) प्रदान करण्यात आला. प्रा. माशाळकर या उमरगा शहर, तर प्रतीक्षा पांगे तालुक्यातील कोरेगावची कन्या आहे. या सन्मानाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

उदाहरणच द्यायचे झाले तर वाजपेयी आणि अडवानी यांचे नाव घेतले पाहिजे. हे कर्तृत्ववान लोक होते. अतिरेकी भूमिका घेऊन त्यांनी समाजकारण किंवा राजकारण केले नाही.''

### तेव्हा मुंबईत आश्रय घेतला

पुढे बोलताना ते म्हणाले की भूजला भूकंप झाला. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी मुख्यमंत्र्यांची बैठक बोलाविली. त्यावेळी अतिवृष्टी- महापूर तसेच भूकंपाचे धोरण ठरविले पाहिजे अशी

## पानिपत युद्धस्मारकासाठी प्र

>> पान १ वरून

मराठ्यांचे रक्त सिंचित झाले आहे. त्यामुळेच ही जागा आमच्यासाठी अत्यंत पवित्र आहे. पानिपतच्या युद्धातून मराठ्यांना खूप काही शिकायला मिळाले. यातून धडा घेत मराठ्यांनी पुढची बहुतांशयुद्धे जिंकली. दिल्ली काबीज केली, अटकेपार झेंडा फडकावला.'' पानिपतच्या युद्धावेळी आपला समाज एक नव्हता. त्यावेळी आपण एकत्र असतो तर युद्धात फटका बसण्याची वेळ आली नसती, असे मत

Sakal Reader's Connect Initiative